दिन विशेष...

१५९८ : राजमाता जिजाबाई यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यात सिंदखेडा येथे झाला.

१७०५ : मराठी राज्याची नवी राजधानी सातारा ही करण्यात आली.

१९१८ : सी.रामचंद्रन यांचा जन्म झाला.

१९६३ : स्वामी विवेकानंद यांची जयंती.

१९९२ : पं.कुमार गंधर्व यांचे निधन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८३,५७६.२४ -६०४.७२ (०.७२%)

डॉलर ₹ ९०.२७

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २९ | १३ |
| दिल्ली | १७ | ०७ |
| मुंबई | ३३ | १६ |
| नागपूर | २७ | १० |
| पुणे | २८ | ०८ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ६४ | किंमत : ५ रु. | पाने ४


### सुविचार

प्रत्येक नवीन दिवस हा नवीन संधी घेऊन येतो, त्याचं स्वागत हसतमुखाने करा.

सुर्योदय - सुर्यास्त

स.-७:०७ संध्या-६:०५

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,४२,०९५/- २,६०,०००/-

### केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०

पिल बाग : २५१ ते २७०

कांदे बाग : ----

# महायुतीच्या वचननाम्यात आश्वासनांचा पाऊस

## बेस्टमध्ये महिलांना ५० टक्के सवलतीसह १८७ पेक्षा जास्त योजना आणि आश्वासनांचा समावेश




वृत्तसंस्था । मुंबई

**बेस्टच्या तिकीटदरात महिलांना ५० टक्के सवलत, वांद्रे-कुर्ला संकुलात आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र उभारून दोन लाख तरुणांना नोकऱ्या, पाणीपट्टी दरवाढीला पाच वर्षे स्थगिती, महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांची प्रवेश क्षमता दुप्पट करणार, महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांसाठी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय विद्यापीठ, यासह अनेक योजना व आश्वासनांचा पाऊस महायुतीने रविवारी प्रकाशित केलेल्या वचननाम्यात पाडण्यात आला आहे. मुंबईतील मराठी माणसाला मुंबईबाहेर जावू देणार नाही, त्याला मुंबईतच हक्काचे घर दिले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.**

### बेस्ट प्रवासासाठी महिलांना ५० टक्के सवलत

बेस्टच्या बस गाड्यांमध्ये पण महिलांना ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. बेस्टच्या ताफ्यातील सर्व गाड्या २०२९ पर्यंत पूर्णपणे विद्युतआधारित करण्यात येणार असून त्यांची संख्या दहा हजार पर्यंत वाढविण्यात येईल. मेट्रो आणि रेल्वे स्थानकावरून घरापर्यंत पोचविण्यासाठी मिडी आणि मिनी बस गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये मोठी वाढ करण्यात येईल.

फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष व केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, भाजपचे केंद्रीय सरचिटणीस विनोद तावडे, मुंबई निवडणूक प्रभारी आशिष शेलार, मुंबई अध्यक्ष अमित साटम आदींच्या उपस्थितीत भाजप, शिवसेना व रिपब्लिकन पक्ष महायुतीचा जाहीरनामा रविवारी प्रकाशित करण्यात आला. महायुतीने लाडक्या बहिणी, तरूण ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आदी सर्वच घटकांसाठी (पान २ वर)

### ➢ उपनगरात कर्करोग रुग्णालय आणि हृदयरोग रुग्णालय

**उपनगरात टाटा रुग्णालयाच्या धर्तीवर महापालिकेचे अद्ययावत कर्करोग रुग्णालय उभारण्यात येणार असून तेथे केमोथेरपी आणि रेडिएशनचा सुविधा मोफत उपलब्ध होतील. त्याचबरोबर हृदयविकाराच्या रुग्णांसाठी स्वतंत्र रुग्णालय उभारण्यात येणार असून तेथे एनजीओप्लास्टी आणि बायपास शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात उपलब्ध होतील. कर्करुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन नायर रुग्णालयाच्या आवारात दहा मजली सुपरस्पेशालिटी कर्करोग रुग्णालय उभारण्यात येईल. केईएम, नायर, सायन आणि कूपर रुग्णालयांना संलग्न परिघीय रुग्णालये उभारण्यात येतील.**

## कोल्हापूर लाचलुचपत विभागाच्या

# डीवायएसपी वैष्णवी पाटलांच्या कारचा अपघात

### कारचा चक्काचूर, दोघांचा मृत्यू; वैष्णवी पाटीलसह तिघे गंभीर जखमी



वृत्तसंस्था । कोल्हापूर

**येथील लाचलुचपत विभागात कार्यरत असलेल्या पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांच्या कारचा कर्नाटकातील चित्रदुर्ग जिल्ह्याजवळ भीषण अपघात झाला. या अपघातात त्यांच्या सोबत प्रवास करणाऱ्या दोघांचा जागीच मृत्यू झाला असून पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांच्यासह आणखी तिघे जण जखमी झाले आहेत. वैष्णवी पाटील यांची प्रकृती सध्या स्थिर असून त्यांच्यावर चित्रदुर्ग येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.**

ही दुर्घटना रविवार दि.११ जानेवारी रोजी पहाटे बेंगळुरूहून कोल्हापूरकडे परतताना घडली. पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील ज्या इनोव्हा कारमधून प्रवास करत होत्या, त्या कारची अचानक समोरून येणाऱ्या लॉरीशी जोरदार धडक झाली. धडक इतकी तीव्र होती की कारचे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले. अपघाताच्या वेळी कारमध्ये असलेल्या दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

या अपघातात पोलिस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांच्या ६५ वर्षीय आई कमला हरीबाबू पाटील आणि ४० वर्षीय चालक राकेश यांचा जागीच मृत्यू झाला, तर वैष्णवी पाटील व इतर दोघांना गंभीर दुखापत झाल्या आहेत. (पान २ वर)

### ➢ अपघाताची घटना कशी घडली?

**चित्रदुर्ग ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत राष्ट्रीय महामार्गावर ही दुर्दैवी घटना घडली आहे. तामिळनाडूतील प्रवास संपवून बंगलोरहून कोल्हापूरकडे परतत असताना अज्ञात वाहनाच्या धडकेमुळे वैष्णवी यांच्या कारचा चेंदामेंदा झाला. सुदैवाने वैष्णवी पाटील यांना वेळीच स्थानिक खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती आता स्थिर आहे. चित्रदुर्ग जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वाखालील तपास सुरु असून, अपघाताचे नेमके कारण तपासातून उलगडणार आहे.**

## थोडक्यात

### शेतकरी उत्पादक संस्थांचा कारभार ढेपाळला

**मुंबई ।** राज्य सरकार शेतकरी उत्पादक संस्थांसाठी (एफपीओ) विविध योजना राबवित आहे. आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देत आहे. तरीही राज्यातील एफपीओंचा कारभार ढेपाळल्याचे समोर आले आहे. एफपीओंचा कारभार सुधारण्यासाठी राज्य सरकार नवे धोरण तयार करीत आहे. नव्या धोरणांत प्रक्रिया उद्योगांवर भर दिला जाणार आहे. शेती उत्पादन, खरेदी, प्रक्रिया उद्योग, विपणन आणि विक्री या सारख्या कामांमध्ये सामूहिकपणे काम करून चांगला बाजारभाव मिळण्यासाठी प्रयत्न सुरू आहे.



### 'हिटमॅन'चा वर्ल्ड रेकॉर्ड

**वडोदरा ।** भारतीय क्रिकेट संघाचा दिग्गज फलंदाज रोहित शर्मा याने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात एक अभूतपूर्व इतिहास रचला आहे. वडोदरा येथील बीसीए स्टेडियमवर खेळताना रोहितने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपले ६५० षटकार पूर्ण केले आहेत. क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये (कसोटी, वनडे आणि टी-२०) मिळून हा टप्पा गाठणारा तो जगातील एकमेव आणि पहिला फलंदाज ठरला आहे.



### राजकीय पक्षांचा 'डिजिटल'वर भर

**मुंबई ।** राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. सर्वच राजकीय पक्षांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या काळात राजकीय पक्षांनी मोठ्या प्रमाणात डिजिटल प्रचारावर भर दिल्याचे दिसत आहे. आधुनिक काळात राजकीय पक्ष प्रचाराची रणनीती ठरवताना अधिकाधिक डिजिटल प्लॅटफॉर्मकडे वळत आहेत. ज्यामुळे यंदाच्या निवडणुका लढवण्याच्या पद्धतीत एक महत्त्वपूर्ण बदल दिसून येत आहे. या बदलत्या प्रचार तंत्रामुळे मुंबई महापालिकेवर राज्य करणाऱ्या २२७ नगरसेवकांची रचना निश्चित होईल.

# ई-संजीवनी सेवेत नाशिक देशात अव्वल

## दवाखान्यात जाण्याची कटकट संपली

वृत्तसंस्था । नाशिक




**भारत सरकारचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय आणि सी-डीएसी यांच्या सहकार्याने 'ई-संजीवनी' ही बाह्यरुग्ण विभागासाठी टेलीमेडिसिन सेवा नाशिक जिल्ह्यात प्रभावीपणे राबवली जात आहे. डिसेंबर महिन्यात देशात सर्वाधिक म्हणजेच १,८१८ नागरिकांनी ई- संजीवनी प्रणालीद्वारे डॉक्टरांशी सल्लामसलत केल्याची उल्लेखनीय नोंद झाली आहे.**

ई-संजीवनी ही मोफत, सुरक्षित व विश्वासार्ह डिजिटल आरोग्य सेवा आहे. नागरिकांना घरबसल्या डॉक्टरांशी चित्रफित किंवा ध्वनिमुद्रण माध्यमातून सल्ला घेण्याची सुविधा यामुळे उपलब्ध झाली आहे.

या सेवेमुळे प्रवासाचा खर्च, वेळेची बचत होते. तसेच रुग्णालयांतील गर्दीही कमी होते. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांसाठी ही सेवा आरोग्य सेवेचा एक महत्त्वाचा आधार ठरत आहे. नाशिक जिल्ह्यातील या यशामागे आशा सेविकांची सक्रिय भूमिका महत्त्वाची ठरली आहे. आशासेविका घरोघरी जाऊन नागरिकांना ई-संजीवनी सेवेबाबत माहिती देत आहेत, नोंदणी कशी करावी, टोकन कसे घ्यावे, डॉक्टरांशी कसा संवाद साधावा, याबाबत मार्गदर्शन करीत आहेत. त्यामुळे डिजिटल आरोग्य सेवांबाबत नागरिकांचा विश्वास वाढताना (पान २ वर)

## धनंजय मुंडे भाजपात प्रवेश करणार?

वृत्तसंस्था । मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि आमदार धनंजय मुंडे सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात मुंडेंचे निकटवर्तीय वाल्मीक कराड हा मुख्य सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. राष्ट्रवादीकडून त्यांच्यावर स्टार प्रचारकाची जबाबदारी देण्यात आली असली, तरी पक्षाच्या प्रमुख कार्यक्रमांपासून ते अलिप्त राहात असल्याचे जाणवत आहे. अशा परिस्थितीत, गेल्या काही दिवसांपासून धनंजय मुंडे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना जोर आला आहे.

# सीसीटीव्हीसाठी निधी द्या, अन्यथा परीक्षा केंद्र रद्द करा

वृत्तसंस्था । पुणे

## दहावी-बारावी परीक्षांतील सीसीटीव्ही अनिवार्यतेवरून शाळा व राज्य मंडळात वाद



**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात येणारी दहावी, बारावीची परीक्षा तोंडावर आली आहे. मात्र, या परीक्षेसाठी परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणेच्या अनिवार्यतेवरून वाद निर्माण झाला आहे. शाळांना सीसीटीव्ही बसवणे अनिवार्य असल्यास त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे सांगत शिक्षण संस्था महामंडळाने शाळांमध्ये सीसीटीव्ही नसल्यास परीक्षा केंद्र रद्द करून परीक्षा घेण्याची मागणी शालेय शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे.**

शिक्षण संस्था महामंडळाने शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे सीसीटीव्ही अनिवार्यतेसंदर्भातील विषय निवेदनाद्वारे मांडला आहे. 'फेब्रुवारी, मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी, बारावीच्या शालांत परीक्षांवेळी गैरव्यवहारांवर नियंत्रण आणण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही बसवण्याचा सूचना निर्गमित झाल्या आहेत.

किती शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवलेले आहेत याची पूर्ण माहिती असताना ज्या शाळांमध्ये यंत्रणा नाही, त्या शाळांना परीक्षा केंद्र म्हणून मान्यता न देण्याची कार्यवाही करता आली असती. ते न करता शाळा व्यवस्थापनावर सर्व जबाबदारी टाकून आपण आणि आपले शासकीय अधिकारी हात (पान २ वर)

# जगातील १७ दशलक्ष इन्स्टाग्राम खात्यांची माहिती लीक

## इन्स्टाग्राम वापरकर्त्यांसाठी धोक्याची घंटा

वृत्तसंस्था । नागपूर

**अलीकडेच प्रसिद्ध आलेल्या एका सायबर-इंटेलिजन्स अहवालानुसार इंस्टाग्राम, फेसबुक संबंधित वापरकर्त्यांचा डेटा (महत्त्वपूर्ण माहिती) डार्क वेबवर प्रसारित केला जात आहे.**

जगभरातील १७ दशलक्ष इंस्टाग्राम खात्याची माहिती अशा पद्धतीने लीक झाली आहे, असे हा अहवाल म्हणतो. याचा अर्थ १७ दशलक्ष वापरकर्त्यांच्या मेल आयडीवरून सायबर ठगांनी त्यांच्या बँकेच्या खात्यांची माहिती मिळवली आहे. अशा परिस्थितीत सध्याच्या समाजमाध्यांच्या जगात प्रत्येकाचे इन्स्टाग्राम, फेसबूक, एक्स अशा विविध ठिकाणी खाते आहेत.

### ➢ अशी घ्या काळजी...



तुमचा डेटा लीक झाला असो वा नसो, वापरकर्त्यांनी सावधानता म्हणून ही खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे. इंस्टाग्रामवरून होणाऱ्या गैरवापराचे प्रकार टाळायचे असतील तर वापरकर्त्यांनी त्यांचा पासवर्ड वेळोवेळी बदलला पाहिजे. सोबतच इंस्टाग्रामशी जोडलेल्या ईमेल खात्याचा पासवर्डही बदलायला हवा. टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन करताना शक्यतो अधिकृत ॲपद्वारेच ते करावे. थेट आलेले संदेश अर्थात डीएम, ईमेल किंवा सुक्ष्म संदेशवर मिळालेल्या संशयास्पद लिंक्सवर क्लिक करू नका. केवळ अधिकृत संकेतस्थळावरून आलेल्या संदेशांची पडताळणी करा. अज्ञात व्यक्तीने अथवा ॲप्सने संदेश पाठवले असतील तर ते काढून टाका. लॉगिन ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवा आणि अज्ञात डिव्हाइसेसमधून लॉग आउट करा.

### कशी होते फिशिंग

**इंस्टाग्रामशी जोडलेले ईमेल आयडी आणि फोन नंबर सायबर गुन्हेगारांकडून मिळवले जातात. वापरकर्ता नावे आणि प्रोफाइल तपशीलचा इतर प्लॅटफॉर्मवरून वापर करत लीक झालेले पासवर्ड पैशांची अफरातफर आणि सेक्स्टॉर्शन फिंगसाठी वापरले जातात. यामुळे लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक होण्याची जोखीम वाढते.**

त्यामुळे तुमचे खाते तर फिशिंगच्या जाळ्यात अडकले नाही ना याची खात्री करा, असा संदेश सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे.

याचा अर्थ असा नाही की प्रत्येक खाते हॅक झाले आहे. परंतु उघड झालेल्या डेटाचा वापर अनेकदा फिशिंग, खाते ताब्यात घेण्याचे प्रयत्न, ओळख फसवणूक आणि सोशल इंजिनिअरिंग हल्ल्यांसाठी केला जात आहे. त्यामुळे समाजमाध्यमांवर सक्रीय असलेल्या प्रत्येकाच्या मनात धास्ती निर्माण झाली आहे.




# 'किंग' कोहलीची सौरव गांगुलीला धोबीपछाड!

वृत्तसंस्था । नाशिक

**भारतीय क्रिकेटचा रन मशीन विराट कोहलीने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या वनडे सामन्यात मैदानात पाऊल ठेवताच एका मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.**

बॅटने धावांचा पाऊस पाडण्यापूर्वीच विराटने भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली याचा एक खास विक्रम मोडीत काढला असून, तो आता भारतासाठी सर्वाधिक वनडे खेळणाऱ्या खेळाडूंच्या यादीत टॉप-५ मध्ये सामील झाला आहे.

**गांगुलीला मागे सारत पाचव्या स्थानी झेप**

न्यूझीलंडविरुद्धचा हा सामना विराट कोहलीच्या कारकिर्दीतील ३०९ वा वनडे सामना आहे. यापूर्वी तो ३०८ सामन्यांसह सौरव गांगुलीच्या बरोबरीने होता. आता सौरव गांगुलीला मागे टाकत तो पाचव्या क्रमांकावर पोहोचला आहे. भारतासाठी सर्वाधिक वनडे सामने (पान २ वर)

## संपादकीय

### जागतिक क्षमता केंद्राचे नवे हब

राज्याच्या नवीन उद्योग धोरणात पुण्याला आर्थिक विकासाचे केंद्र बनवण्याच्या दिशेने पाऊल उचलण्यात आले आहे. पुण्याला जीसीसी म्हणजेच 'जागतिक क्षमता केंद्रांचे हब' बनवण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील उद्योग विभागाचे नाव बदलून आता 'उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभाग' असे करण्यात आले असून, तसा शासननिर्णय काढण्यात आला आहे. गुंतवणुकीसाठी 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र' ही कंपनी तयार करण्यात आली असून, त्यासाठी ३ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे. नव्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी १ लाख १८ हजार २७५ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र हे देशात उद्योगधंद्यात आघाडीवरील राज्य असून, विदेशी गुंतवणुकीत आपण गुजरातला देखील मागे टाकले आहे. राष्ट्रीय उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा १३.६% चा आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेत उद्योगाचा वाटा २५ टक्क्यांचा आहे. देशात येणाऱ्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ३१ टक्के गुंतवणूक राज्यात होते. त्यामुळे विकासाचा वेग आणखी पुढे न्यायचा असेल, तर उद्योग, सेवा आणि गुंतवणूक यांचा समग्रतेने विचार केला पाहिजे. मात्र महाराष्ट्रात उद्योगधंदे वाढायचे असतील, तर प्रथम कायदा आणि सुव्यवस्था यांची परिस्थिती सुधारली पाहिजे व उद्योजकांकडून गावगुंड जी खंडणी घेतात, ते प्रकार थांबले पाहिजेत. उद्योजकांना सतावणाऱ्या राजकीय गुंडगिरीचा बंदोबस्त झालाच पाहिजे. राज्याच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात, म्हणजेच जीडीपीमध्ये उद्योग क्षेत्राचा वाटा सध्या २४% आहे. आणखी दहा वर्षांत तो २७ टक्क्यांपर्यंत आणि २०४७ पर्यंत ३०% पर्यंत जावा, असे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. दिवसेंदिवस शेती ही आतबट्ट्याची ठरत असून, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीकडून उद्योगांकडे वळवणे भागच आहे. महाराष्ट्रात सव्वातीन लाख किलोमीटरचे रस्ते आणि सहा हजार किलोमीटरवर रेल्वेचे जाळे आहे. समृद्धी महामार्गाच्या कडेकडेने विकास व्हावा, असे नियोजन आहे. त्यासाठी नवीन आठ टाउनशिप प्रकल्प या महामार्गाच्या आजूबाजूला उभारले जाणार आहेत. मुंबई आणि जेएनपीटीवरून होणारी मालवाहतूक एकूण वाहतुकीच्या ५३% एवढी आहे. वाढवण बंदर झाल्यानंतर मालवाहतूक आणखी वाढणार असून, तिचा वेगही वाढेल. महाराष्ट्र सरकार गुंतवणूक आकर्षित करून घेण्यासाठी नवी दिल्ली, बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद येथे ‌‌ङ्कंट्री डेस्कफ स्थापन करणार आहे. अशी डेस्क अमेरिका, स्वीडन, जर्मनी, तैवान, ऑस्ट्रेलिया, जपान येथेही स्थापन केली जातील. मात्र हे आश्वासन देण्यात आले असले, तरी ते प्रत्यक्षात केव्हा येईल, हे पाहावे लागेल! कारण मोठमोठ्या घोषणा होतात, परंतु प्रत्यक्षात त्या प्रमाणात गुंतवणूक आणि उद्योग आकर्षित होऊन, विकासप्रक्रिया गतिमान होत असल्याचे दिसत नाही. आता पुण्याजवळील पुरंदर येथे प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनाच्या मोबदल्यापोटी आवश्यक असलेल्या ६ हजार कोटी रुपयांचा निधी कर्ज स्वरूपात उभारण्यात येणार आहे. त्यासाठी हुडको या संस्थेकडून अर्थसाह्य घेतले जाणार असून, मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवण्यात येणार आहे. पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सात गावांतील ३ हजार एकर जागेचे संपादन करण्यात येणार आहे. पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांसाठी नियोजित पुरंदर विमानतळ हा नक्कीच उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे विमानतळाच्या कामाला राज्य सरकारकडून अग्रक्रम दिला जात आहे. परंतु पुरंदर विमानतळासाठी शेतकऱ्यांना प्रती एकरी दर किती मिळणार, हे अद्याप जाहीर झालेले नाही. त्याचप्रमाणे रस्ते विकास महामंडळाकडून पुण्यातील रिंग रोडसाठी हुडकोकडूनच कर्जउभाणी करण्यात आली आहे. त्या पाठोपाठ पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी हुडकोकडून कर्ज घेण्याची तयारी सरकारने सुरू केली आहे. हा निधी लवकरात लवकर मिळाल्यास शेतकऱ्यांना मोबदला देऊन, जमीन संपादित करता येईल.

# जळगावात दोन ठिकाणी महिला बचत गटांसाठी 'उमेद मॉल'

## • नाशिक विभागातून फक्त जळगाव जिल्ह्याला मिळाली मान्यता; ग्रामविकास विभागाकडून शासन आदेश जारी

प्रतिनिधी । जळगाव

**महिला स्वयंसहायता बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना कायमस्वरूपी व हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने 'उमेद मॉल' (जिल्हा विक्री केंद्र) स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील १३ जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून, नाशिक विभागातून फक्त जळगाव जिल्ह्याला मान्यता मिळाली आहे.**

'उमेद' अभियानांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तू व उत्पादनांना कायमस्वरूपी आणि हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्यास मान्यता देण्यात आली असून, या संदर्भातील शासन निर्णय राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत जारी करण्यात आला आहे.महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत राज्यभरात लाखो महिला स्वयंसहायता गट कार्यरत असून, या गटांमार्फत खाद्यपदार्थ, मसाले, पापड, लोणची, हस्तकला वस्तू, कपडे, गृहउपयोगी साहित्य, स्थानिक व पारंपरिक उत्पादने तयार केली जातात. मात्र, दर्जेदार उत्पादने असूनही अनेक वेळा या महिलांना योग्य बाजारपेठेअभावी अपेक्षित उत्पन्न मिळत नव्हते. ही अडचण दूर करण्यासाठीच शासनाने 'उमेद मॉल' संकल्पना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. शासन निर्णयानुसार निवड करण्यात आलेल्या जिल्ह्यांमध्ये ठराविक जागी 'उमेद मॉल'ची निर्मिती करण्यात येणार असून, या मॉलमधून केवळ महिला बचत गटांच्या उत्पादनांचीच विक्री केली जाणार आहे. यामुळे महिलांना थेट ग्राहकांशी संपर्क साधता येणार असून, मध्यस्थांशिवाय विक्री व्यवस्थेमुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. तसेच उत्पादनांना एकसमान ब्रँडिंग, दर्जा नियंत्रण व सुसंगत दर रचना मिळण्यास मदत होणार आहे. 'उमेद मॉल'च्या माध्यमातून महिला बचत गटांना केवळ विक्रीची संधीच मिळणार नाही, तर त्यांना उद्योजकतेचे प्रशिक्षण, बाजारपेठेचे ज्ञान आणि आर्थिक आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्याची संधी मिळणार आहे.




### • महिला उद्योजकतेला नवी दिशा

शासनाच्या अध्यादेशानुसार उभारण्यात येणाऱ्या 'उमेद मॉल'मध्ये महिला गटांकडून तयार होणारे खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, गृहउपयोगी साहित्य, कपडे, स्थानिक व पारंपरिक उत्पादने आदींची विक्री करण्यात येणार आहे. नाशिक विभागातून केवळ जळगाव जिल्ह्याची निवड होणे, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यास मोठा हातभार लागणार आहे. या माध्यमातून महिला बचत गटांच्या उत्पादनांना स्वतंत्र ओळख, व्यापक बाजारपेठ व आर्थिक स्थैर्य मिळेल. महिला उद्योजकतेला नवी दिशा मिळेल, असा विश्वास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी व्यक्त केला आहे.

# गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या हस्ते कास्ट्राईब दिनदर्शिकेचे प्रकाशन



प्रतिनिधी । जळगाव

**कास्ट्राईब कर्मचारी महासंघातर्फे तयार करण्यात आलेल्या कास्ट्राईब दिनदर्शिका-२०२६ चे प्रकाशन नुकतेच जळगाव पंचायत समितीचे गट शिक्षण अधिकारी अजित तडवी यांच्याहस्ते करण्यात आले.**

याप्रसंगी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे नाशिक विभागीय अध्यक्ष रविंद्र तायडे, जिल्हाध्यक्ष पुलकेशी केदार, जिल्हा कार्याध्यक्ष योगेश अडकमोल, शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापू साळुंके, वनविभाग संघटनेचे जिल्हाध्यक्ष विकास सोनवणे, शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष नितीन सोनवणे, जिल्हा सचिव राजीव वानखेडे, जिल्हा कार्याध्यक्ष किशोर साळुंके, तालुका सचिव राहुल मोरे, ज्येष्ठ सल्लागार गोपीचंद भालेराव, मनपातील संघटनेचे कार्याध्यक्ष नंदकुमार गायकवाड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी विभागीय अध्यक्ष रविंद्र तायडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर देखील श्री तडवी यांच्याशी चर्चा केली.

# नळ, लाईट फिटींगचे साहित्य लांबवणाऱ्यास अटक

## • २८ हजारांचे साहित्य जप्त; एमआयडीसी पोलिसांची कामगिरी

प्रतिनिधी । जळगाव

**नव्याने बांधकाम झालेले घर फोडून त्यातून नळ आणि लाईट फिटींगचे साहित्य लांबवणाऱ्यास एमआयडीसी पोलिसांनी अटक केली. सैय्यद उबेद सैय्यद रफीक पटवे (वय-१९) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव असून त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. त्याच्याकडून २८ हजार रुपयांचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.**



शहरातील टी.एम. नगर परिसरातील नव्याने बांधकाम झालेल्या घरात लाईट आणि नळ फिटिंगचे काम सुरू होते. अज्ञात चोरट्यांनी घराचा कडी-कोंडा तोडून नळ फिटिंग तसेच लाईट फिटिंगचे साहित्य चोरी करून नेल्याची घटना २८ ते २९ डिसेंबरदरम्यान घडली होती. या प्रकरणी घरमालकाने दि.७ जानेवारी रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. दरम्यान, या घटनेचा तपास सुरू असतांना मिळालेल्या माहितीच्या आधारे व गुप्त बातमीदारांच्या मदतीने पोलिसांनी सैय्यद उबेद सैय्यद रफीक पटवे (वय-१९) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने त्याच्या एका साथीदाराच्या मदतीने हा गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून २८ हजार रुपये किमतीचे नळ आणि लाईट फिटिंगचे साहित्य हस्तगत करण्यात आले असून पुढील तपास सहायक फौजदार विजयसिंग पाटील व पोलीस कॉन्स्टेबल निलेश पाटील करीत आहेत.

**■ या पथकाने केली कारवाई...**

पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक राहुल तायडे, चंद्रकांत धनके, सहायक फौजदार विजयसिंग पाटील, पोलीस हवालदार रमेश चौधरी, गणेश ठाकरे, नितीन ठाकूर, राहुल घेटे, किरण पाटील आदींच्या पथकाने ही कारवाई केली. गुन्हा उघडकीस आणण्यासाठी नेत्रम विभागातील पंकज खडसे, कुंदनसिंग बयस व मुबारक देशमुख यांच्या तांत्रिक मदतीने फुटेजचे बारकाईने विश्लेषण करण्यात आले.

# अर्पण ट्रस्टतर्फे मतदानावर जनजागृती

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिका निवडणुकीसाठी गुरूवार, दि.१५ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून यात मतदानाचा टक्का वाढावा, म्हणून अर्पण ट्रस्टतर्फे शहरातील विविध भाग व महाविद्यालयांमध्ये जावून मतदानावर जनजागृती केली.**




या उपक्रमात अर्पण ट्रस्टचे जगदीश कुमार, पवन चॅरिटेबल ट्रस्टचे डॉ.विलास नारखेडे, लीलाधर नारखेडे, ॲड.सलीम शेख, राजेश वाणी, पवन नारखेडे, रघुनाथ राणे, लोकेश राणे, मोहित नारखेडे, कैलास भोळे, डॉ.हरी सोनार, नितीन साळुंखे, प्रकाश घोलप, राणी सोनवणे, कमल पाटील, सचिन भोळे आदींनी सहभागी होत शहरातील महिला कॉलेज, माध्यमिक विद्यालय, मु.जे. महाविद्यालय, एस.एन.डी.टी महाविद्यालय, बाहेती कॉलेज, धनाजी नाना महाविद्यालयासह व काही कॉर्नर पॉईंटवरील युवकांना मतदानाविषयी मार्गदर्शन केले.

लोकशाही बळकट करण्यासाठी शहरातील सर्व समाजातील लोकांनी मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, त्यात तरुण, युवक, महिला, युवती, दिव्यांग मतदार अशा सर्वांनी मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे, त्या माध्यमातून युवा पिढी देशात सकारात्मक बदल घडवून आणू शकतात. आदर्श नागरिक व आदर्श समाज तयार कसा होईल, यात युवा मतदार महत्त्वाची भूमिका बजावतात, त्यांना विविध प्रकारच्या सामाजिक, रोजगारयुक्त व स्थानिक लेव्हलच्या समस्या काय आहेत याबाबत माहिती असते तसेच सक्षम व्यवस्था निर्माण करण्यासाठी युवक, युवतींनी मतदानासाठी पुढे यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती खडके विद्यामंदिरात साजरी



प्रतिनिधी । जळगाव

**येथील स्वा.सै. ज.सु. खडके प्राथमिक विद्यामंदिरात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापक संजय पाटील व ज्येष्ठ शिक्षिका वंदना धुमाळ यांच्याहस्ते प्रतिमापूजन व माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर इयत्ता चौथीची विद्यार्थिनी कुमारी नंदिनी जांगिड हिने मी जिजाऊ बोलते ही एकांकिका सादर केली. तर नैतिक महाजन या विद्यार्थ्याने स्वामी विवेकानंदांविषयी माहिती सांगितली. शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका धुमाळ यांनी राजमाता जिजाऊ यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर माहिती सांगितली. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक संजय पाटील यांनी विद्यार्थ्यांना हिंदवी स्वराज्याविषयी व स्वामी विवेकानंदांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमांचे सुत्रसंचालन सपना देव-घाटोळे यांनी केले. यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# मनरेगा बचावसाठी जळगावात काँग्रेसचे लाक्षणिक उपोषण

## • जिल्हाभरातून असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते झाले होते सहभागी

प्रतिनिधी । जळगाव

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अर्थात मनरेगा योजना बचावसाठी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्यावतीने मनरेगा बचाव अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत जळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले.**

भाजपा सरकारने मनरेगा योजना रद्द करून जी रामजी या नावाने नवीन योजना आणली असून त्यामुळे गोरगरीब जनतेला अडचणीचा सामना करावा लागणार आहे असा आरोप करत ही योजना पूर्ववत करावी, या मागणीसाठी जळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. उपोषणात जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार, उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील, महिला अध्यक्ष सुलोचना वाघ, सरचिटणीस ज्ञानेश्वर कोळी, जमील शेख, भागवत सूर्यवंशी, पाचोरा तालुका अध्यक्ष सचिन सोमवंशी, अनंत परिहार, व्हि.डी.पाटील, युवक जिल्हाध्यक्ष महेश पाटील, प्रदेश सचिव आशुतोष पवार, भरत पाटील, संजू जमादार, भाईदास पवार, पुरुषोत्तम पाटील, रवींद्र निकम, राजू डोंगरदिवे, मनोज चौधरी, आर.एस. पाटील, नाना नेरकर, रतिलाल महाजन, प्रतिभा सोनवणे, अनिता कोळी, प्रतिभा पाटील, शिला पावरा, युवराज खडके, दिलीप घोलप, रवींद्र सोनवणे, ताराचंद सोनवणे, शेख बशीर, उद्धव वाणी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.



**■ जनतेला अडचणीचा सामना करावा लागणार...**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही योजना २००५ मध्ये पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली यूपीए सरकारने सुरू केली होती. मनरेगा योजने अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक माणसाला रोजगार मिळण्याची हमी देण्यात आली होती. मात्र, भाजपा सरकारने मनरेगा योजना रद्द करून नवीन जी रामजी या नावाने नवीन योजना आणली आहे, त्यामुळे गोरगरीब जनतेला अडचणीचा सामना करावा लागणार असल्याचा आरोप यावेळी उपोषणकर्त्यांकडून करण्यात आला.

## पान १ वरुन

### कोल्हापूर लाचलुचपत विभागाच्या......

कोल्हापूर अँटी करप्शनमध्ये कार्यरत असलेल्या वैष्णवी पाटील या दक्ष व निष्ठावान अधिकारी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी लाचलुचपतविरोधी मोहिमांमध्ये मोलाची भूमिका बजावली असून, स्थानिक पातळीवर भ्रष्टाचाराच्या जाळ्यात अनेक मोठे मासे पकडले आहेत. रजा काढून कुटुंबासोबत प्रवासाला निघालेल्या वैष्णवी यांच्या आई कमला पाटील या गृहिणी होत्या, तर चालक राकेश हे अनुभवी ड्रायव्हर होते. अपघातानंतर वैष्णवी यांचे कुटुंबीय आणि कोल्हापूर पोलीस अधिकारी यांनी चित्रदुर्ग येथे धाव घेतली.

### सीसीटीव्हीसाठी निधी......

झटकून मोकळे झाले आहेत. सीसीटीव्ही यंत्रणा अत्यंत खर्चिक आहे. त्यासाठी निधी उपलब्ध न करून देणे ही आपली जबाबदारी आहे. ही यंत्रणा उपलब्ध न झाल्यास सदरील शाळांचे केंद्र रद्द करून आपण शालांत परीक्षा घ्याव्यात,' असे महामंडळाने निवेदनात नमूद केले आहे. गेल्या बारा वर्षांत शासनाकडून वेतनेतर अनुदान मिळालेले नाही. सरकारच्याच जिल्हा परिषद, शासकीय शाळांमध्येही सीसीटीव्ही बसवण्यात आलेले नाहीत. दहावी, बारावीच्या परीक्षा सीसीटीव्ही नसतानाही होतच होत्या. काही शाळांमध्ये गैरप्रकार होतात, म्हणून सरसकट सर्वांना वेठीला धरले जात आहे. केंद्र प्रमुखांची अदलाबदली केली जाणार आहे. त्यामुळे नियुक्त होणाऱ्या केंद्रप्रमुखांना ते काम करत असलेल्या शाळेबाबत काहीही माहिती नसणार आहे. सीसीटीव्ही बसवणे, भटके श्वान रोखणे असे काहीतरी चित्रविचित्र निर्णय घेतले जात आहेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवायचे कधी? इंग्रजी शाळांसाठी मराठी शाळा संपवण्याचा घाट घातला जात आहे, अशी टीका महामंडळाचे सरकार्यवाह रवींद्र फडणवीस यांनी केली.

### ई-संजीवनी सेवेत......

दिसून येत आहे. 'ई-संजीवनी'च्या माध्यमातून नागरिकांना विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, औषधांविषयी सूचना तसेच पाठपुरावाही केला जात आहे. सल्लामसलतीदरम्यान दिली जाणारी डिजिटल माहिती नागरिक थेट डाउनलोड करू शकतात. या सेवेसाठी आभा आयडी आवश्यक असून त्यामुळे रुग्णांच्या आरोग्य नोंदी सुरक्षितपणे एकत्रित ठेवता येते. ही सेवा डिजिटल इंडिया आणि आयुष्मान भारत या राष्ट्रीय उपक्रमांचा एक महत्त्वाचा भाग आहे.

### महायुतीच्या वचननाम्यात......

अनेक निर्णय व योजनांची १८७ हून अधिक आश्वासने देण्याचा धडाका लावून त्यांना खूश करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.मुंबईकरांच्या पाणीपट्टीमध्ये दरवर्षी आठ टक्के वाढ होत असून त्यास पाच वर्षे स्थगिती देण्यात येईल, असे शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या धर्तीवर महापौरांसाठीही निधी तयार करून त्यातून पाच ते ५० हजार रुपयांपर्यंत अर्थसहाय्य करण्यात येईल.

६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना महापालिकेच्या रुग्णालयात वर्षातून एकदा मोफत आरोग्य तपासणी, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना दूरध्वनी केल्यावर घरी रुग्णवाहिका व डॉक्टर तपासणीसाठी उपलब्ध होतील. मुंबईतील वैद्यकीय शिक्षण क्षमता दुप्पट करणार -मुंबई महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश क्षमता दुप्पट करण्यात येणार असून तेथे पदवी आणि पदव्युत्तरच्या जागा वाढविण्यात येतील. पूरमुक्त मुंबई - जपानी तंत्रज्ञान, आयआयटी आणि व्हिजेटीआय यांच्या मदतीने येत्या पाच वर्षात मुंबईला पूर्णपणे पूरमुक्त करण्यात येणार आहे. पर्जन्य जलवाहिनीचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी उपाययोजना केल्या जातील. ब्रिमस्टोवँड-२ ची अपूर्ण कामे लवकर पूर्ण केली जातील. सतत पूर येणाऱ्या भागात पंपिंग स्टेशन्स उभारून जलद गतीने पाण्याचा उपसा करण्यात येईल. त्याचबरोबर पूरस्थितीचा अभ्यास करून उपाययोजना करण्यासाठी आयआयटीच्या तज्ञांचा संशोधन गट स्थापन करण्यात येईल.

### 'किंग' कोहलीचा ......

खेळणाऱ्या खेळाडूंची यादी: खेळाडू- सचिन तेंडुलकर (वनडे सामने - ४६३), एम. एस. धोनी (वनडे सामने ३४७), राहुल द्रविड (वनडे सामने ३४०), मोहम्मद अझरुद्दीन (वनडे सामने ३३४), विराट कोहली (वनडे सामने ३०९), सौरव गांगुली (वनडे सामने ३०८).

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# नंदुरबारमध्ये माजी आ.शिरीष चौधरींच्या घरावर हल्ला

## हातात लाठ्याकाठ्या घेत टोळक्याने केलेल्या दगडफेकीत घराचे मोठे नुकसान

प्रतिनिधी । नंदुरबार

**येथील नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर निघालेल्या मिरवणुकीत झालेल्या वादाचे पडसाद नंदुरबारमध्ये शनिवारी रात्री उशीरा पाहण्यास मिळाले. या वादातून एका टोळक्याने अंमळनेरचे शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) माजी आमदार शिरीष चौधरी यांच्या घरावर दगडफेक केली. रात्री हातात लाठ्याकाठ्या घेत टोळक्याने केलेल्या दगडफेकीत माजी आमदार शिरीष चौधरी यांच्या घराचे मोठे नुकसान झाले असून पहाटे या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**





नंदुरबार नगपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी शनिवारी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे अंमळनेरचे माजी आमदार शिरीष चौधरी यांचे पुत्र प्रथमेश चौधरी यांची निवड झाली. या निवडीनंतर त्यांची शहरातून जोरदार मिरवणूक काढण्यात आली. याच मिरवणुकीत जळका बाजार परिसरात दुपारी वाद उदभवला. उपनगराध्यक्ष झाल्यानंतर शिरीष चौधरी आणि त्याचे पुत्र पट ठोकत असल्याचा संशय दुसऱ्या गटाला आला. या वादातून दोन गटात हाणामारी झाली. किरकोळ स्वरुपात दगडफेक करण्यात आली, असेही म्हटले जात होते. या प्रकरणी एका गटाने पोलीस ठाण्यात दाखल होत आपले म्हणणे मांडले होते. त्यामुळे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. यानंतर माजी आमदार शिरीष चौधरी हे देखील पोलीस ठाण्यामध्ये दाखल झाले होते. त्यांच्या बाजुनेही म्हणणे मांडण्यात आल्यावर गुन्हा दाखल करण्याच्या हालचाली सुरु झाल्या होत्या. अशातच शनिवारी रात्री ८ ते ९ वाजेच्या सुमारास दोन्ही गटात सामोपचाराने समझोता झाला. त्यामुळे याप्रकरणी पोलीस ठाण्यात कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता. परंतु, एका गटाने मारहाण झाल्याचा राग मनात ठेवला होता. या गटाने रात्री उशीरा माजी आमदार शिरीष चौधरी याच्या घरावर हल्ला केला. यात शिरीष चौधरी यांच्या घराच्या काचा फुटल्या. हातात दांडके घेवून या टोळक्याने हा हल्ला केला. विशेष म्हणजे शिरीष चौधरी यांची गाडी देखील जाळण्याचा प्रयत्न झाल्याचे सांगितले जाते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी परिसरातचोख बंदोबस्त तैनात केला.

### ➤ ५० अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल

**या घटनेप्रकरणी शिरीष चौधरी यांच्या तक्रारीवरुन २९ जणांवर नावांसह तर ४० ते ५० अज्ञांताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुळातच, टोळक्याच्या हल्ल्यानंतर नंदुरबार शहरात तणावपूर्ण शातंता असून या हल्ल्यांविषयी पोलिसांनी दाखविलेल्या भूमितेवर संताप व्यक्त केला जात आहे. शनिवारी रात्री झालेल्या घटनांविषयी पोलिसांनी वेळीच खबरदारी घेत गुन्हा दाखल केला असता तर रात्री असंतोषातून इतक्या मोठ्या प्रमाणात दगडफेक आणि तोडफोडीची घटना घडली नसती, असे नागरिकांचे म्हणणे आहे. शनिवारी दिवसा दोन गटांमध्ये तणाव निर्माण झाल्यानंतर पोलिसांनी संशयितांच्या हालचालींवर नजर ठेवण्याची गरज होती, असे म्हटले जाते.**

**अवैध धंदेवाल्यांनीच हल्ला केल्याचा आरोप**

दरम्यान, माझ्या घरावर झालेला हल्ला हे राजकीय षडयंत्र असून काही राजकीय पुढाऱ्यांच्या वरदहस्ताने अवैध धंदेवाल्यांनीच माझ्या घरावर हा हल्ल्या केल्याचा आरोप माजी आमदार शिरीष चौधरी यांनी केला आहे. या हल्ल्यामागील सूत्रधार कोण, हे शोधण्याची गरज असल्याचे म्हणत हल्लेखोरांनी हल्ल्यात धारदार शस्त्र आणि पेट्रोल बॉम्बचा वापर केल्याचा आरोप शिंदे गटाचे नेते माजी आमदार शिरीष चौधरी यांनी केला आहे.

## थोडक्यात

### विद्या गौरव इंग्लिश स्कूलमध्ये क्रीडा महोत्सव

**बोरद ।** आमलाड येथील विद्या गौरव प्रायमरी, गौरव सेकंडरी इंग्लिश मीडियम स्कूल तसेच गौरव आर्ट्स, कॉमर्स व सायन्स ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य विश्वास पवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ललित पाठक उपस्थित होते. विभागीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेली विद्यार्थीनी तेजस्विनी वळवी हिने मशाल हातात घेऊन शाळेच्या मैदानावर संचलन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचलन क्रीडा शिक्षक पुलायन जाधव यांनी केले तर आभार संकेत सोजळ यांनी मानले.

### तळोदा येथे गणित दिन साजरा

**तळोदा ।** येथील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाच्या गणित विभागामार्फत राष्ट्रीय गणित दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात धुळे येथील कै.डॉ. पां.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयाच्या गणित विभागाचे माजी विभाग प्रमुख प्रा.एम.डी. सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना गणित विषयाचे विविध शाखांमधील व दैनंदिन जीवनातील असलेले महत्त्व यावर विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हेमंत दलाल होते. सूत्रसंचालन प्रा.डॉ. स्वप्निल वाणी यांनी केले.

### पाचोराबारी विद्यालयात पार पडले विज्ञान प्रदर्शन

**नंदुरबार ।** तालुक्यातील पाचोराबारी येथील के.डी. गावित माध्यमिक विद्यालयात शालेयस्तरीय विज्ञान प्रदर्शनचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभागी होत विविध उपकरणे सादर केली. प्रदर्शनाचे उद्‌घाटन संस्थेच्या सचिव ऋषिका गावित यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी माजी सरपंच धरमसिंग प्रधान, सरपंच सुनीता नाईक, मुख्याध्यापक गोरखनाथ बोराणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. उद्‌घाटनानंतर मान्यवरांनी प्रदर्शनाची पाहणी केली तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रयोगाबद्दलची माहिती घेतली. विज्ञान शिक्षिका कविता पटेल यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा यासाठी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रवीण पटेल यांनी केले. यशस्वीतेसाठी मनोहर वसईकर, किरण पाडवी, संतोष पाडवी, राजेंद्र ईशी, राजेश पटेल, वंदना खैरनार, ईश्वर गिरासे, कृष्णा सामुद्रे आदींनी परिश्रम घेतले.

# युवकांसह महिला शक्तीची ताकदही भाजप सोबत : पालकमंत्री रावल

प्रतिनिधी । धुळे

**भारतीय जनता पक्षाच्या विकासाच्या राजकारणाने प्रभावित होऊन विविध पक्षांतील पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते पक्षाला साथ देण्यासाठी पुढे येत आहेत. या कार्यकर्त्यांच्या प्रवेशाने युवकांसह महिला शक्तीची ताकदही भाजपच्या सोबतीने आली आहे. यातून महापालिका निवडणुकीत भाजपला यश मिळेल, असा विश्वास पालकमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.**



आमदार अनुप अग्रवाल यांच्या जनसंपर्क कार्यालयात माजी नगरसेविका योगिता पवार, मयूर पवार, धर्मवीर गौरव जगताप प्रतिष्ठानचे पदाधिकारी अमोल भामरे, दर्शन खैरनार, दर्शन कोठावदे, राजा बडगुजर यांच्यासह नवनाथनगर मित्रमंडळाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला. पालकमंत्री रावल यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आमदार अनुप अग्रवाल, महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, महानगर जिल्हा सरचिटणीस ओमप्रकाश खंडेलवाल, सुनील कपिल, प्रभाग सहाचे प्रभारी यशवंत येवलेकर, डॉ.संदीप पाटील, माजी नगरसेवक भगवान गवळी, कमलेश देवरे, प्रफुल्ल पाटील, जयेश वावदे, अमित दुसाने आदी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री रावल यांच्याहस्ते धर्मवीर गौरव जगताप प्रतिष्ठानचे पदाधिकारी अमोल भामरे, हर्षद जाधव यांना भाजयुमोच्या महानगर जिल्हा उपाध्यक्षपदी, तर प्रशांत खैरनार यांना भाजयुमोच्या महानगर सचिवपदी नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

### जळखे आश्रमशाळेत शस्त्र प्रदर्शन

प्रतिनिधी । नंदुरबार

येथील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत पोलीस वर्धापन दिन अर्थात रायझिंग डेनिमित्त शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजोग बच्छाव, पोलीस उपनिरीक्षक पाटील व त्यांच्या टीमने शाळेत इ.६ वी ते इ.१० वीच्या विद्यार्थ्यांना पोलीस दलातील विविध शस्त्रांची तसेच शस्त्रांची प्रत्यक्ष हाताळणी कशी व केव्हा केली जाते याविषयी माहिती दिली.

# बनावट देशीदारूची तस्करी रोखली

## ➔ राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाची कारवाई

प्रतिनिधी । धुळे

**राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने शिरपूर तालुक्यातील हाडाखेड सीमा तपासणी नाक्यावर सापळा रचून बनावट देशीदारूची तस्करी रोखली. या कारवाईत १ लाख २० हजाराची दारू आणि ४ लाखांची कार असा एकुण ५ लाख २० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

सीमावर्तीभागातगस्तीदरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, शिरपूरकडून सेंधवाकडे जाणारे क्र. एमपी ०९-झेडसी-८२६० वाहन अडवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनातून बनावट देशीदारूचा मोठा साठा आढळून आला. कारवाईत ९० मि.ली. क्षमतेच्या बनावट देशीदारूच्या ३ हजार बाटल्या (३० बॉक्स) तसेच वाहन जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ५ लाख २० हजार रुपये आहे.

याप्रकरणी सुरेश ऐशराम बारेला उर्फ चौहान (रा. चाटली ता. निवाली जि. बडवानी, म.प्र. व ह.मु. आमोदे ता. शिरपूर) यास अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमातील कलम ६५(अ), ६५(ई), ९० व १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक स्वाती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक देविदास नेहूल, ए.पी. मते, दुय्यम निरीक्षक संतोष निकम, जवान के. एम. गोसावी, केतन जाधव, प्रतीकेश भामरे, हेमंत पाटील, एम.पी. म्हस्के, वाहन चालक रविंद्र देसले व निलेश मोरे यांचे पथकाने केली.




# स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी मैत्रीसह आनंद जपावा : जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते





प्रतिनिधी । धुळे

**सामाजिक न्याय व विशेष साहाय विभागातर्फे आयोजित स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंनी उत्साहाने, खिलाडूवृत्तीने खेळाचा आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले.**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत नाशिक महसूली विभागातील विभागीय शालेय क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन जिल्हा क्रीडा संकुल, धुळे येथे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते झाले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमास राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक स्वाती काकडे, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग, नाशिक माधव वाघ, जिल्हा क्रीडा अधिकारी मनोहर पाटील, महिला व बाल विकास विभागाचे परिविक्षा अधिकारी गिरीष जाधव, विशेष अधिकारी (शानिशा) राजेंद्र कांबळे, सविता लबडे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, तुम्ही येथे केवळ स्पर्धेसाठी नव्हे, तर मनोरंजनासाठी एकत्र आले आहात. सर्व खेळाडूंनी उत्साहाने, खिलाडूवृत्तीने आणि आनंदाने खेळाचा आनंद घ्यावा. आयोजकांनी या स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केले आहे. विजय किंवा पराभव कोणताही असो, परस्पर मैत्री, सलोखा आणि खेळभावना कायम ठेवावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक स्वाती काकडे म्हणाल्या की, विभागीय शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी याच उत्साहाने पुढील आयुष्यातही विविध स्पर्धांमध्ये सहभाग घ्यावा. प्रादेशिक उपायुक्त माधव वाघ म्हणाले की, सामाजिक न्याय विभागांतर्गत नाशिक विभागातील विविध शासकीय निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या क्रीडा स्पर्धा ऐतिहासिक ठरतील आणि या स्पर्धा सर्वांसाठी अविस्मरणीय ठरतील.

सहाय्यक आयुक्त संजय सैंदाणे यांनी सांगितले की, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच त्यांच्यातील क्रीडा कौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने या विभागीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. नाशिक विभागातील धुळे, नंदुरबार, नाशिक, जळगाव आणि अहिल्यानगर येथील एकूण १० शाळांनी या स्पर्धेत सहभागी झाल्या आहेत. प्रारंभी मान्यवरांना मानवंदना देण्यात आली. त्यानंतर पथसंचलन व भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेशचंद्र दराडे यांनी केले, तर मनोजकुमार देवरे यांनी आभार मानले.

# मुकटी शिवारात विनापरवाना देशीदारूचा साठा जप्त

## तिघांना अटक; धुळे तालुका पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी । धुळे

**विना परवाना देशी दारूची चोरटी वाहतूक करणाऱ्या तीन वाहनांवर धुळे तालुका पोलिसांनी शनिवार, दि.१० रोजी कारवाई केली. या कारवाईत तीन वाहनांसह ३० लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तिघांना अटक करण्यात आली आहे.**



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धुळे पोलिसांकडून विशेष तपासणी मोहिम हाती घेण्यात आली आहे. या तपासणी मोहीमेदरम्यान, पारोळा येथून धुळ्याच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर मुकटी (ता.धुळे) गावाच्या शिवारातून एम.एच.१८, बी.एच. ८८९१ मधून रॉकेट नावाची देशी दारूची चोरटी वाहतूक होणार असल्याची गोपनिय माहिती धुळे तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांना मिळाली होती.त्यानुसार त्यांनी प्रशांत राठोड, योगेश पाटील, कुणाल पानपाटील, सोमनाथ कांबळे, सुमित ठाकुर, चेतन कंखरे, मुकेश पवार, विशाल पाटील, प्रमोद पाटील, रविंद्र सोनवणे व रविंद्र राजपूत आदींचे पथक तयार करुन कारवाईच्या सुचना दिल्या. त्यानुसार पथकाने मध्यरात्री एक ते अडीच वाजेच्या दरम्यान मुकटी शिवारातील हॉटेल एकता परिसरात एका उभ्या ट्रकमधून दारूचे बॉक्स पिकअप वाहनात उतरवित असताना छापा टाकला.

या कारवाईत राकेश छगनलाल जैन (वय-३५), दीपक अशोक शिंदे (वय-३५) व सुदाम भुरा गोसावी (वय-४२) यांना अटक करण्यात आली. तसेच ट्रकमधून (क्र. एम.एच.१८, बी.एच.८८९१) मधून ३ लाख चार हजाराचे रॉकेट देशी दारूचे ७६ बॉक्स, पिकअप (क्र.एम.एच.०४, जे.यु. ८७२२) मधून एक लाख ९२ हजाराचे ४८ बॉक्स, १५ लाखाचा ट्रक, ५ लाखांचे पिकअप वाहन, ५ लाखाची कार (क्र.एम.एच. ४, ई.डी.९३३४), २१ हजाराचे चार मोबाईल असा ३० लाख १७ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी धुळे तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून तिघांना अटक करण्यात आली आहे.

# बीएड सीईटीसाठी अर्ज प्रक्रियेला सुरुवात

प्रतिनिधी । शिरपूर

**महाराष्ट्र शासनाच्या सीईटी सेलमार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी दोन वर्षांच्या बी.एड. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षेच्या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली आहे.**

इच्छुकांना दि.२३ जानेवारीपर्यंत ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येणार आहेत. राज्यातील कोणत्याही बी.एड. महाविद्यालयात प्रवेशासाठी बी.एड. सीईटी परीक्षा देणे अनिवार्य असून, सीईटी शिवाय प्रवेश मिळणार नाही. कोणत्याही शाखेतील पदवी, पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेले तसेच पदवी किंवा पदव्युत्तर परीक्षेच्या अंतिम वर्षात शिकत असलेले विद्यार्थी सीईटी अर्ज भरण्यास पात्र आहेत. सीईटी फॉर्म भरण्यासाठी दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर परीक्षेचे गुणपत्रक, जातप्रमाणपत्र, नॉन क्रीमीलेयर प्रमाणपत्र, आधार कार्ड व फोटो आदी कागदपत्रे आवश्यक आहेत.

शिरपूर येथील आर.सी. पटेल शिक्षणशास्त्र (बी.एड.) महाविद्यालय येथे हे सीईटी फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## साईबाबा हॉस्पिटलच्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. योगिता काटे यांनी केले मार्गदर्शन

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित दादासाहेब डॉ. सुरेशजी पाटील महाविद्यालयात शनिवार, दि. १० जानेवारी रोजी आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून चोपडा येथील साईबाबा हॉस्पिटलच्या सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. योगिता काटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. काटे यांनी शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे. यश संपादन करण्यासाठी वेळेचे महत्त्व ओळखून योग्य नियोजन करणे, तसेच गुणवत्ता वृद्धीवर भर देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.**



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे होते. यावेळी महात्मा गांधी शिक्षण मंडळ, चोपडा नियामक मंडळाचे सदस्य यशवंत खैरनार, उपप्राचार्य प्रा. डॉ. आर. एम. बागुल, प्रा. डॉ. ए. बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ. शैलेशकुमार वाघ, उपप्राचार्य पी. एस. पाडवी, स्नेहसंमेलन प्रमुख ए. एन. बोरसे व व्ही. पी. हौसे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी राज्यस्तरीय करंडक व पारितोषिक प्राप्त ङ्गङ्घमसेकंड हॅन्डफफ्फ्र या एकांकिकेचे विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण केले.

मोबाईलच्या अति वापरामुळे उद्भवणाऱ्या समस्या, प्रेमभंगातून निर्माण होणारे वैवाहिक प्रश्न व स्त्री स्वातंत्र्य यावर प्रकाश टाकत प्रबोधनात्मक संदेश देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या वरिष्ठ महाविद्यालयीन (शिक्षक-कर्मचारी) संघास, उपविजेत्या कनिष्ठ महाविद्यालयीन संघास तसेच तृतीय क्रमांकाच्या शिक्षकेत्तर कर्मचारी संघास पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. मुकेश पाटील यांना ङ्गमॅन ऑफ द मॅचफ तर प्रतीक पाटील यांना ङ्गमॅन ऑफ द सिरीजफ पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथे निवड झालेल्या जागृती बारी हिचाही विशेष सन्मान करण्यात आला. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बी. एम. सपकाळ, डॉ. सौ. के. एस. क्षीरसागर, डॉ. डी. एस. पाटील व सौ. विशाखा देसले यांनी केले, तर आभार प्रदर्शन ए. एन. बोरसे यांनी मानले. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार वितरित करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विविध समिती सदस्यांनी परिश्रम घेतले.सपकाळ, डॉ. सौ. के. एस. क्षीरसागर, डॉ. डी. एस. पाटील व सौ. विशाखा देसले यांनी केले तर आभार कनिष्ठ विभाग वार्षिक स्नेहसंमेलन प्रमुख व पर्यवेक्षक ए. एन. बोरसे यांनी आभार मानले.

कार्यक्रमानंतर महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार वितरित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य, उपप्राचार्य, समन्वयक, पर्यवेक्षक व स्नेहसंमेलन प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समिती प्रमुख, सदस्य तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी बहुसंख्य विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू-भगिनी उपस्थित होते.

> मान्यवरांच्या हस्ते क्रिकेट, हॉलीबॉल, मेहंदी, रांगोळी, व्यंगचित्र,चित्रकला,पारंपारिक वेशभूषा, रॅम्प वॉक, क्रिकेट, पाककला, आनंद मेळावा, विविध खेळ व नाटिका, पथनाट्य, एकल नृत्य, समूह नृत्य, आदिवासी नृत्य, कॉमेडी शो,सुगम गायन, समूह गायन, गीत गायन, शेला पागोटे, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, प्रश्नमंजुषा स्पर्धा व अन्य विविध स्पर्धांमधील विजेत्यांना तसेच एनएसएस विभागातील उत्कृष्ट स्वयंसेवक, एनसीसी व क्रीडा विभागातील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# अशोक लाडवंजारी यांच्या प्रचारार्थ आज सभा

प्रतिनिधी । जळगाव



**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रभाग क्र. १४ मधील अधिकृत उमेदवार अशोक सीताराम लाडवंजारी, तडवी नाजमीन मकबुल, सना शेख रियाज, जमिलोद्दीन शेख शारीफुद्दीन शेख यांच्या प्रचारार्थ दि. १२ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता बिलाल चौक येथे माजी मंत्री आमदार एकनाथराव खडसे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले आहे.**

यावेळी माजी आमदार संतोष चौधरी, रा.काँ.युवक प्रदेश अध्यक्ष महेबुब शेख राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, महानगराध्यक्ष एजाज मलिक, जामनेरचे नगरसेवक जावेद मुल्ला यांची प्रमुख उपस्थिति राहणार आहे.

या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन कल्लु खाटीक, ईसा व्यापारी, मुस्तफा मिर्झा, फिरोज खान, नईम खाटीक, नदीम शेख, रफीक शहा, सलीम काकर, डॉ. रिजवान खाटीक, सुभाष घुगे, अकिल पेंटर्स, गोपाळ हटकर, अफसर खाटीक, योगेश लाडवंजारी आदींनी केले आहे.

# म्हसवे विद्यालयात बालविवाह प्रतिबंधक माहिती, तंबाखूमुक्त शपथ

प्रतिनिधी । पारोळा

तालुक्यातील म्हसवे येथील ज्ञानदीप बहुद्देशीय विद्याप्रसारक मंडळ संचलित प्राथमिक व माध्यमिक विद्यालय म्हसवे शाळेत मंगळवारी आधार बहुउद्देशीय संस्था अमळनेर या संस्थेमार्फत बालविवाह प्रतिबंधक व तंबाखूमुक्त शपथ घेण्यात आली. संस्थेच्या सचिव श्रीमती सरिता देशमुख यांच्या सूचनेनुसार कार्यक्रम घेण्यात आला. यावेळेस आधार संस्थेचे कर्मचारी मोहिनी धनगर व समाधान अहिरे यांनी ही शपथ दिली. श्रीमती मोहिनी धनगर यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा व त्याचे अंमलबजावणी कशा पद्धतीने होते. याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

## थोडक्यात

### अंजाळे गावाजवळील रस्ता दुरुस्ती कधी?

**यावल ।** अंजाळे गावापासून ते शनिमंदिरा पर्यंत काही अंतरावर अतिशय मोठ्या प्रमाणात रस्ता खराब झाला आहे. वारंवार वाहन धारक रस्ता दुरुस्तीची मागणी करीत आहेत. रस्त्याची इतकी खराब परिस्तिती आज पर्यंत पाहायला देखील मिळाली नव्हती ती आज दिसतेय. १५ दिवसापासून रस्त्याच्या बाजूला खडी पडून आहे. मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग बघ्याची भूमिका घेत आहेत. सुदैवाने या ठीकांनी गंभीर अपघात झाला नसला तरी लहान मोठे अपघात हे दररोज घडत असतात. शनिमंदिराजवळ मोठ्या प्रमाणात रस्ता खराब झाला आहे.

### बोरखेडा येथे मोफत डोळे तपासणी व रक्तदान शिबिर

**रावेर ।** तालुक्यातील बोरखेडा येथे माजी पोलीस पाटील कै. अरुण पाटील यांच्या स्मरणार्थ व श्री सत्यसाई सेवा समिती व तुलसी आय हॉस्पिटल नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. १० रोजी ८ ते १२ या वेळेत मोफत डोळे तपासणी शिबीर घेतले जाणार आहे. यातील मोतीबिंदू शस्त्रक्रियासाठी निवडलेल्या रुग्णांवर विनामूल्य ऑपरेशन नाशिक येथे होणार आहे. या शिबिराचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# समाजकार्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन

प्रतिनिधी । चोपडा

**भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन दि. १० जानेवारी ते १६ जानेवारीदरम्यान शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, विष्णापूर येथे करण्यात आले आहे. सदर शिबिराचे उद्घाटन डॉ. दिलीप गिन्हे, ( विभागीय समन्वयक, चोपडा, क.ब.चौ. उ.म.वी. जळगाव), संदीप सेते, (माजी स्वातंत्र्य सैनिक, विष्णापूर) यांच्या हस्ते करण्यात आले.**



याशिबिराच्या उद्घाटन प्रसंगी समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौदाणकर, प्रा. डॉ. नारसिंग वळवी, भूषण भिल, (माजी उपसभापती विष्णापूर) प्रा. डॉ. संबोधी देशपांडे, (कार्यक्रम अधिकारी), प्रा. डॉ. उत्तम सोनकांबळे, (सहाय्यक कार्यक्रम अधिकारी) उपस्थित होते.

प्रा. डॉ. दिलीप गिन्हे यांनी आपल्या उद्घाटनपर मनोगतात सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजनेमधील शिबिरामध्येच युवकांचा खरा व्यक्तिमत्व विकास होतो.

या सात दिवसात मिळणारी व्याख्यानांची शिदोरी तुम्हाला आयुष्यभर पुरेल. शाश्वत विकासामध्ये असणारी युवकांची भूमिका याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संदीप सेते यांनी आरोग्य हीच खरी युवकांची संपत्ती आहे. युवकांनी खऱ्या अर्थाने जागृत होऊन, राष्ट्रहितासाठी सेवा करणे हे युवकांचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांनी सर्व विद्यार्थ्यांना शिबिरा बाबत शुभेच्छा दिल्या. या शिबिरात ज्या गोष्टी आपल्याला शिकायला मिळणार आहेत नक्कीच त्याचा फायदा पुढील आयुष्यात आपणास होईल.

आपण सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन, आपल्यातील कलागुणांचा विकास करून घ्यावा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. सदर उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम एस डब्ल्यू - प्रथम वर्षाची विद्यार्थिनी संदिपा निकम यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. उत्तम सोनकांबळे यांनी मानले.

## अंतुर्ली येथील छत्रपती शिवाजी महाराज स्तंभ सुशोभिकरणाची मागणी

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

तालुक्यातील अंतुर्ली येथील बसस्टँडवर असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्तंभाचे सुशोभि करण करण्यात यावे, यासाठी ग्रामस्थांच्या वतीने सरपंच पतींना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, आपल्या ग्रामपंचायतमार्फत बसस्टँडवर छत्रपती शिवाजी महाराजांचा स्तंभ उभारण्यात आला आहे. स्तंभ उभारून ७-८ वर्ष होऊन गेले. या काळात कोणत्याही प्रकारची दुरुस्ती केली गेली नाही. आज त्या स्तंभाची रूपरेषा मावळत आहे हे दुर्दैव म्हणावं लागेल. कारण छत्रपती शिवाजी महाराज अखंड भारताचे दैवत आहे. तरी याकडे लक्ष घालून सुशोभीकरण करावे ही सर्व ग्रामस्थांची मागणी होत आहे. येणाऱ्या शिवजयंतीपर्यंत आपण तत्काळ निर्णय घ्यावा, निवेदन देताना गणेश सोनार, अमोल दानी, पवन पाटील, विशाल पाटीलसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# सी.बी.निकुंभ हायस्कूलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम; बक्षीस वितरण उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील घोडगांव येथील नूतन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सी. बी. निकुंभ माध्य. व उच्च माध्य. विद्यालय व एस. एन. आर. जी. इंग्लिश मीडियम स्कूलचा सांस्कृतिक कार्यक्रम व वार्षिक बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला.**





यावेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रहासभाई गुजराथी यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत विविध कलागुणांना आत्मसात केले पाहिजे. पुढील आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शिस्त महत्वाची आहे. यासाठी प्रत्येकाने शालेय शिस्त पाळली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवात सरस्वतीपूजन व दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी इयत्ता ७ वी तील विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. यानंतर इयत्ता १० वी व १२ वीच्या मार्च - २०२५ परीक्षेत प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता ८ वीतील माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २२ व एनएमएमएस परीक्षेत ४ शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व शालेय शिक्षण विभाग आयोजित शिक्षक/ कर्मचारी स्पर्धामध्ये नाशिक विभागावर फोटोग्राफी स्पर्धेत निवड झाल्याबद्दल शाळेचे उपशिक्षक रुपेश नेवे यांचा सत्कार करण्यात आला, ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उच्च माध्यमिक गटात प्रथम आलेल्या प्रकल्पात सहभागी प्रसन्न कोळी (९वी ) व द्वारकेश चौधरी (१० वी) व मार्गदर्शक शिक्षक सागर गाडीलोहार यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शासकीय शालेय क्रीडा स्पर्धेत लांब उडी प्रकारात नाशिक विभागावर निवड झालेल्या वैशाली कोळी (१२ वी) व मार्गदर्शक शिक्षक नरेंद्र सपकाळे यांचाही सत्कार करण्यात आला.


**आयसीआयसीआय लोम्बार्ड व सी. बी. निकुंभ शाळा यांच्या वतीने सर्व शालेय विद्यार्थ्यांचा अपघात विमा काढला जातो. यात लाभार्थी विद्यार्थ्यांना वैद्यकीय खर्चाची मदत केली जाते, इयत्ता ७ वी ब मधील कृष्णा प्रकाश ठाकरे या विद्यार्थ्याला या मदतीचा धनादेश यावेळी देण्यात आला. तसेच शाळेला व विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाणपत्र देणाऱ्या देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. त्यात शाळेचे माजी मुख्याध्यापक राजेंद्र चौधरी, वसंत नागपुरे, रामकृष्ण शिंपी, संतोष कोळी, युवराज रजाळे, अरुण रजाळे, माजी विद्यार्थिनी शीतल सोनवणे, एटीएम गृप चोपडा, पूर्वल सोनवणे हातेड, डॉ. स्नेहलकुमार भामरे चोपडा, डॉ. बाळकृष्ण पाटील चाळीसगाव, स्नेहल देशमुख अमेरिका, पंकज तायडे अमळनेर, राकेश पाटील नागपूर, समाधान पाटील इंग्लंड यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर सी. बी. निकुंभ हायस्कूल व एस. एन. आर. जी. इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे बहारदार अश्या विविधरंगी, विविधढंगी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी मंचावर संस्थेचे अध्यक्ष चंद्रहासभाई गुजराथी, भूपेंद्रभाई गुजराथी, उपाध्यक्ष द्रविलाल पाटील, सचिव जवरीलाल जैन, सहसचिव भानुदास पाटील, संचालक मदन पाटील, रमेश पाटील, कुमुदिनी गुजराथी, हर्षा गुजराथी, मृणाल गुजराथी, रामकृष्ण शिंपी, युवराज रजाळे, संतोष कोळी, विनोद पाटील, घोडगावचे पोलीस पाटील प्रभाकर सोनवणे, सी. बी. निकुंभ हायस्कुलचे मुख्याध्यापक रमेश चौधरी, पर्यवेक्षक विनोद पाटील, एस. एन. आर. जी. इंग्लिश मेडीयम च्या प्राचार्या जेनीफर साळुंके यांच्यासह परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन जगदीश पाठक, प्रा. समाधान बिऱ्हाडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.**

# इंदूर-हैद्राबाद महामार्गाच्या कामाला गती

## ➲ पोलीस बंदोबस्तात रस्ता सपाटीकरण व भराव कामास झाली सुरुवात

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**शहरानजीकच्या खामखेडा पुलाजवळील ७५३ एल इंदूर-हैदराबाद या चार पदरी रस्त्याच्या कामांना अखेर पोलीस बंदोबस्तात सुररुवात करण्यात आली आहे.**



संबंधित शेतकऱ्यांच्या शेतजमिनीची मोजणी पूर्ण होऊन अधिग्रहित शेतजमिनीची जेसीबीने खोदकाम काळी बर्डीपासून सुरू झालेले आहे. काही शेतात गहू, कांदा, तूर इतर पिके आहेत. या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई मिळेल काय? असा सवाल बाधित शेतकरी करीत आहेत. याबाबत माहिती अशी, सन २०२२ पासून सुमारे ५० शेतकरी योग्य मोबदल्यासाठी शासनस्तरावर लोकप्रतिनिधींकडे विविध मार्गाने प्रयत्न करीत आहेत. शहरी व ग्रामीण भागातील भावात मोठी तफावत असून सध्याच्या महागाईनुसार शेतकऱ्यांना जमिनीचे दर हवे होते. परंतु भूसंपादन जमीन कायद्यापुढे आणि शासनाच्या दबावापुढे शेतकऱ्यांना यश आले नाही. म्हणून लवाद निकालाविरोधात सेक्शन ३४ नुसार संबंधित शेतकरी न्याय मागण्यासाठी जिल्हा न्यायालयात गेले आहेत. सदर प्रकरण फेरमूल्यांकन सुनावणीसाठी लवाद अर्थात जिल्हाधिकारी यांच्याकडे येईल. त्या आशेवर तरी सध्या बाधित शेतकरी अवलंबून आहेत.

> **व्यापारीकरणास गती**
> इंदूर- हैदराबाद या चार पदरी रस्त्याच्या कामांस सुररुवात झाल्याने जळगाव ते इंदूर अंतर किमान १५० किमीने कमी होणार आहे. त्यामुळे खान्देशातील व्यापारास गती येणार आहे.

# चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये चित्रकार घडत असतो : कलाशिक्षक गायकवाड



प्रतिनिधी । चोपडा

जगभरात विविध देशात इंटरनॅशनल रंगोत्सव चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे यात चोपड्यातील चोपडा एज्युकेशन सोसायटी प्रताप विद्या मंदिरात तालुक्याभरातील विविध शाळांनी या इंटरनॅशनल रंगोत्सव चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठा सहभाग घेतला यात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे चित्र रंगून त्यात नऊ प्रकारचे चित्र काढण्यात आले त्यात स्केच कार्टून यांसह विविध चित्र काढण्यात आले. चोपडा एज्युकेशन सोसायटीच्या सचिव माधुरी मयूर योगीभाई मयूर,संस्था समन्वयक गोविंद गुजराती प्रताप विद्या मंदिराचे मुख्याध्यापक प्रशांत गुजराथी, पर्यवेक्षक अतुल भट, नागलवाडी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पी डी पाटील, पर्यवेक्षक एस व्ही करमरकर, माजी कलाशिक्षक ए. ए.गायकवाड उपस्थित होते. संस्थेच्या सचिव माधुरीताई मयूर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेचे नियोजन पर्यवेक्षक, कलाशिक्षक पंकज नागपुरे ,कलाशिक्षक कमलेश गायकवाड (इव्हेंट डायरेक्टर रंगोत्सव सेलिब्रेशन मुंबई) यांनी केले.